प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email: helpdoc@rbi.org.in

19 जून 2020

**बँकिंग विनियमन अधिनियम, 1949, कलम 56 चे वाचन करीता कलम 35 A अंतर्गत निर्देश - यूथ डेव्हलपमेंट को. ऑ. बँक लिमिटेड, कोल्हापुर, महाराष्ट्र - ठेवीदारांसाठी पैसे काढण्याची मर्यादा वाढविणे**

बँकिंग विनियमन अधिनियम, 1949 कलम 56 चे वाचन करीता, कलम 35 A, उप कलम (1) अनुसार, ठेवीदारांच्या हितसंरक्षणासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने, दिनांक 04 जानेवारी 2019 रोजी दिलेल्या निर्देश सं.DCBS.CO.BSD-I/D-6/12.22.311/2018-19 च्या अनुषंगाने यूथ डेव्हलपमेंट को. ऑ. बँक लिमिटेड, कोल्हापुर, महाराष्ट्र, वर दिनांक 5 जानेवारी 2019 ची कार्यालयीन वेळ संपल्यापासून, सहा महिन्यांपर्यंत दिशानिर्देश लादले होते. विद्यमान दिशानिर्देशांनुसार प्रत्येक ठेवीदारास पैसे काढण्याची मर्यादा ₹5000/- आहे.

बँकेची तरलता स्थिती आणि ठेवीदारांना देय देण्याच्या क्षमतेचा आढावा घेऊन, दिनांक 19 जून 2020 च्या दिशानिर्देश क्र.DOR.CO.AID No.D-90/12.22.311.2019-20 अनुसार असा निर्णय घेतला आहे की पैसे काढण्याची मर्यादा प्रति ठेवीदारास ₹20,000/- (रुपये वीस हजार फक्त) पर्यंत, यापूर्वी परवानगी असलेल्या ₹5000/- च्या मर्यादेच्या समावेशासह वाढविण्यात आलेली आहे. वरील सवलती नुसार बँकेचे 76% हून अधिक ठेवीदार त्यांच्या खात्यातील संपूर्ण शिल्लक रक्कम खात्यातून काढून घेऊ शकतील.

उपरोक्त संदर्भाधीन निर्देशांच्या इतर सर्व अटी व शर्ती या वेळोवेळी सुधारित केलेल्या निर्देशानुसार कायम राहतील.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2019-2020/2527**